# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : diplomadesk10dte@gmail.com Website: www.dtemaharashtra.gov.in

परिपत्रक
ई-मेलव्दारे

जा.क्र.१०/एनजीपी/हिवाळी सुट्टी /२०१६-१७/ 9806
दिनांक : 14 OCT 2016

विषय- हिवाळी सुट्टी शैक्षणिक वर्ष २०१६-१७

सर्व शासकीय व शासकीय अनुदानित व विनाअनुदान तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर पदविका ( स्वायत्त तंत्रनिकेतना व्यतिरिक्त इतर ) संस्थामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांना प्रती वर्षी ४० दिवस उन्हाळी सुट्टी व २० दिवस हिवाळी सुट्टी देण्यात येते.

त्या अनुषंगाने सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, त्यांच्या संस्थेतील जे कर्मचारी ( व्हॅकेशनल स्टाफ ) सुट्टीस पात्र आहेत, त्यांना महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाने नेमून दिलेल्या सत्राचा कालावधी लक्षात घेऊन शैक्षणिक परीक्षा व उत्तरपत्रिका मुल्यमापनाच्या कामासाठी लागणारा शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग थोपवून दिनांक २४.१०.२०१६ ते १२.११.२०१६ पर्यत २० दिवस हिवाळी सुट्टी देण्यात यावी.

परीक्षा तसेच उत्तरपत्रिका मुल्यमापनाच्या कामासाठी ज्या कर्मचा-यांना थांबविण्यात येईल ते परीक्षेची कामे सुरळीत पार पाडतील व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा अडथळा येणार नाही, याची दक्षता घ्यावी. त्यांना पुढे असे ही कळविण्यात येते की, संबधित कर्मचारी वर्गाकडून परीक्षेच्या कामामध्ये कोणत्याही प्रकारची दिरंगाई किंवा काम चुकारपणा दिसून आल्यास त्यांच्यावर नियमाप्रमाणे शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, हे ही संबधित कर्मचा-यांच्या निदर्शनास आणावे.

तसेच ज्या संस्थांना शैक्षणिक स्वायतत्ता दिलेली आहे, त्या संस्थांना त्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्याच्या कालावधीचा विचार करुन तसेच महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाच्या परीक्षेच्या कामासाठी लागणारा कर्मचारी वर्ग उपलब्ध करुन दिला जाईल, या अटीवर त्यांच्या सोईनुसार सुट्टी देण्यास परवानगी देण्यात येत आहे. तथापी सदर सुट्टी २० दिवसापेक्षा जास्त असू नये.

( डॉ. सुभाष महाजन )
संचालक, तंत्रशिक्षण, म. रा., मुंबई

प्रत- प्राचार्य, शासकीय, शासकीय अनुदानित व विनाअनुदानित तत्वावर चालणारी तंत्रनिकेतने व इतर तत्सम पदविका संस्था ( संबधित सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालये यांचे मार्फत )

प्रत- माहिती व पुढील आवश्यक कार्यवाही करीता अग्रेषित:
१. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, बांद्रा (पूर्व), मुंबई-५१
२. सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती/औरंगाबाद/मुंबई/नागपूर/नाशिक/पूणे.
३. उपसचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, विभागीय कार्यालय, औरंगाबाद/मुंबई/नागपूर/पूणे.
४. कार्यासन क्र.२, २अ, ४, ४अ, ७ व १२ मुख्य कार्यालय, मुंबई
५. कार्यासन क्र. ३ (आयटीसेल), मुख्य कार्यालय, मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.